## प्रकरण पहिले

# उपोद्घात


| अ.क्र. | | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १.१. | : | प्रास्ताविक | १ ते १ |
| १.२. | : | संशोधनविषय निवडण्यामागील भूमिका | १ ते २ |
| १.३. | : | पूर्व संशोधनाचे स्वरुप | ३ ते ४ |
| १.४. | : | प्रबंधाची उद्दिष्टे | ४ ते ४ |
| १.५. | : | वापरलेल्या संशोधनपद्धती व स्वीकारलेले धोरण | ५ ते ५ |
| १.६. | : | प्रबंधाची मांडणी | ५ ते ७ |
| १.७. | : | समारोप | ७ ते ७ |

# प्रकरण पहिले

# उपोद्घात

## १.१. प्रास्ताविक :

'मराठी कथात्मक साहित्यातील माणदेशाचे चित्रण' ह्या प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात हा संशोधनविषय निवडण्यामागील भूमिका सविस्तर मांडावयाची आहे. नंतर मराठी ग्रामीण व प्रादेशिक कथात्मक साहित्याची प्रारंभापासून वाटचाल कशी झाली, ह्याची थोडक्यात पाहणी करावयाची आहे. पूर्व संशोधनाच्या पार्श्वभूमीवर निश्चित केलेल्या प्रबंधाची उद्दिष्टे नमूद करावयाची आहेत. प्रबंधात प्रामुख्याने चार साहित्यिकांचा विचार केलेला आहे. ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात आणि द. ता. भोसले ह्यांच्या कथात्मक साहित्यामधील माणदेशी चित्रणाचा अभ्यास करताना ज्या संशोधन पद्धतींचा अवलंब केलेला आहे आणि जे धोरण अवलंबिलेले आहे, त्या सर्वांची विस्ताराने माहिती द्यावयाची आहे. शेवटी ह्या प्रबंधाची मांडणी एकूण किती प्रकरणांमध्ये केली आहे, त्यांची शीर्षके व तपशील थोडक्यात मांडावयाचा आहे.

## १.२. संशोधनविषय निवडण्यामागील भूमिका :

स्वातंत्र्यपूर्व काळात पुण्या - मुंबईकडील साहित्यिक साहित्यनिर्मिती करीत होते. स्वातंत्र्यानंतर त्यात बदल झाला. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रदेशांमधून अनेक साहित्यिक उदयास आले. त्यात कोकण, मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र व माणदेश इ. प्रदेशांचा समावेश होतो. माणदेशातून उदयास आलेल्या साहित्यिकांपैकी काहींनी कथात्मक लेखन केले. ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, द. ता. भोसले, उत्तम बंडू तुपे, भीमराव कुलकर्णी इ. चा त्यात समावेश आहे. ह्यातील माडगूळकर बंधू, खरात आणि भोसले ह्यांच्या कथात्मक साहित्यात तुलनेने माणदेशाचे चित्रण विपुल प्रमाणात, गुणवत्तेने दर्जेदार व वैशिष्ट्यपूर्ण आढळते. म्हणून ह्या चार साहित्यिकांच्या कथात्मक साहित्यामधील माणदेशाचे चित्रण केंद्रस्थानी ठेवून हे संशोधन करावयाचे ठरविले आहे.

'यमुनापर्यटन' (१८५७) ह्या मराठीतील पहिल्या स्वतंत्र कादंबरीनंतर खऱ्या अर्थाने मराठी कादंबरीच्या वाटचालीस प्रारंभ झाला. र. वा. दिघ्यांच्या 'पाणकळा' (१९३९) ह्या कादंबरीनंतर मराठीत प्रादेशिक कादंबऱ्यांची लाट उसळली. व्यंकटेश माडगूळकरांच्या

'बनगरवाडी' (१९५५) ह्या कादंबरीनंतर मराठी कादंबरीविश्वात माणदेशाचे चित्रण येऊ लागले. ह्यातील माणदेश म्हणजे साधारणपणे माणगंगा नदीला जेथून जेथून पाणी येऊन मिळते, तो पाणलोट क्षेत्राचा भाग होय. माणदेश ह्या प्रदेशाचे नाव, प्राकृतिक रचना, हवामान, जमीन, पाऊस, नैसर्गिक वनस्पती व जंगले, पशुधन, मेंढपाळ, समाजजीवन, सांस्कृतिक पार्श्वभूमी अशी वैशिष्ट्ये जाणवतात, त्यांचा सांगोपांग विचार केलेला आहे.

महाराष्ट्रातील लोकजीवन व लोकसंस्कृती ह्यांचा परिचय करुन घ्यावयाचा असेल, तर अशा प्राकृतिक रचनेतून तयार झालेले जे लोकजीवनाचे एकत्वात भिन्नत्व असलेले छोटे छोटे जे विभाग आपणाला दिसतात, त्यांचे सर्वांगीण संशोधन करावे लागेल. त्यामुळे माणदेशी कथात्मक साहित्याचे संशोधन मी केलेले आहे. कारण कथात्मक साहित्याचा पट हा व्यापक असतो. कविता, नाटक, ललितलेख इ. वाङ्मयप्रकार ह्या साहित्यिकांनी हाताळले आहेत, परंतु कथा, कादंबरीतून माणदेशाचे चित्रण अधिकांशाने जाणवते, असे वाटल्याने ह्या कथात्मक साहित्याचा अभ्यास मी तपशिलाने केला आहे. कारण कथात्मक साहित्याव्यतिरिक्त अन्य वाङ्मयप्रकार हे चित्रण तपासण्याच्या दृष्टीने काहीसे मर्यादित व गैरसोयीचे आहेत. दुसरा भाग असा की, नाटक हा वाङ्मयप्रकार शुद्ध वाङ्मयकला म्हणून मानला जात नाही. कवितेत भावनेला स्थान असते, तर ललितसाहित्य लालित्याकडे वळलेले असते. ह्या पार्श्वभूमीवर कथात्मक साहित्यातील कथा आणि कादंबरी ह्या वाङ्मयप्रकारांद्वारे जीवनाचा मोठा पट उलगडलेला असतो. त्याचा आवाका मोठा असतो. म्हणून माणदेशाच्या चित्रणाचे संशोधन सविस्तर केले आहे.

मराठी कथात्मक साहित्यात माणदेशाच्या चित्रणाने मोलाची भर घातलेली आहे. संपूर्ण माणदेशी संस्कृती, सामाजिकता त्यातून व्यक्त होते. माडगूळकरांनी आपल्या अस्सल माणदेशी भाषेद्वारा कथात्मक साहित्यात नवीन प्रयोग केलेले दिसतात. तसेच माणदेशी बोलीतून खास माणदेशी असणारे चारशे शब्द माणदेशी बोलीचा वेगळेपणा ठळक करण्यास मदत करतात. ह्या सर्वांचा मी प्रबंधातून सविस्तर अभ्यास केलेला आहे. कथात्मक साहित्यातून माणदेशाचे चित्रण अधिकांशाने आलेले आहे. ह्या सर्व माणदेशी साहित्यिकांच्या प्रतिभेचा अविष्कार त्यांच्या कथात्मक साहित्यातून झालेला असल्यामुळे त्यांचे अन्य लेखन बाजूला ठेवून त्यांचे कथात्मक लेखन, विशेषत: त्यातील माणदेशाचे चित्रण असा मी संशोधनविषय निश्चित केलेला आहे.

## १.३. पूर्व संशोधनाचे स्वरुप :

मराठी कथात्मक साहित्यावर नियतकालिक व ग्रंथ ह्यांच्या माध्यमामधून आजपर्यंत बरेचसे लेखन झाले आहे. मात्र त्यातील माणदेशाचे चित्रण ह्यावर संशोधन झालेले नसल्यामुळे त्यावर संशोधन होणे गरजेचे वाटले. म्हणूनच मी 'मराठी कथात्मक साहित्यातील माणदेशाचे चित्रण' हा विषय केंद्रस्थानी ठेवून संशोधन करावयाचे ठरवले. माणदेशात जे साहित्यिक येतात, त्यांच्यावरील संशोधन वेगवेगळ्या विद्यापीठांमधून एम्.फिल्. व पीएच्.डी. प्रबंधांच्यारुपाने झालेले आहे. त्यांचे स्वरुप असे :

### एम्.फिल्. प्रबंधिका :

- 'व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेतील सामाजिकतेचे स्वरुप' (विशेषत: 'काळी आई', 'माणदेशी माणसे', 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहांच्या अनुषंगाने) चुनामारी लीला, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८४.
- 'कादंबरीमधील निसर्ग आणि समाज' (विशेषत: 'माचीवरील बुधा' व 'बनगरवाडी' या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने) पाटील गणपती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८७.
- 'बनगरवाडी' कादंबरीचे विशेष, कदम वि. द., शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८९.
- 'शंकरराव खरात व वामन होवाळ यांच्या कथालेखनाचा तुलनात्मक अभ्यास', ('सांगावा' व 'येळकोट' या संग्रहांच्या आधारे) पोळ रमेश, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९२.
- 'द. ता. भोसले यांच्या कथेतील प्रादेशिकता' ('अगं अगं म्हशी' व 'पाऊस' या संग्रहांच्या अनुषंगाने), मगर संभाजी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९७.
- 'द.ता. भोसले यांच्या कथालेखनाचे विशेष' ('पाळत' व 'पाऊस' या संग्रहांच्या आधारे) भोसले हेमलता, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९७.

### पीएच्.डी. प्रबंध :

- 'ग.दि. माडगूळकर यांचे वाङ्मय : एक चिकित्सिक अभ्यास', जोशी श्रीपाद, पुणे विद्यापीठ, पुणे, १९८१.

✧ 'व्यंकटेश माडगूळकर : एक चिकित्सक अभ्यास', अत्रे सुप्रिया, श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई, १९८४.

✧ 'कवी ग. दि. माडगूळकर' : चिकित्सक अभ्यास, नरुले श्रीकांत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८६.

✧ 'शंकरराव खरात यांच्या वाङ्मयाचा सर्वांगीण अभ्यास', व्हटकर जयवंत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९५.

✧ 'शंकरराव खरात : व्यक्ती आणि वाङ्मय', डहाके वासुदेव, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९९०.

माणदेशी चित्रणाच्या संदर्भात हे सर्व संशोधन अपुरे आहे. वरील सर्व संशोधकांनी माणदेशाच्या चित्रणावर भर दिलेला दिसत नाही. त्यामुळे 'मराठी कथात्मक साहित्यातील माणदेशाचे चित्रण' हा संशोधन विषय निश्चित केलेला आहे.

## १.४. प्रबंधाची उद्दिष्टे :

'मराठी कथात्मक साहित्यातील माणदेशाचे चित्रण' ह्या संशोधन विषयात पुढील उद्दिष्टे ठेवली आहेत :

१. मराठी कथात्मक साहित्याचे स्वरुप जाणून घेणे.

२. ग्रामीण व प्रादेशिक साहित्य ह्यामधील भेद निश्चित करणे.

३. 'माणदेश' ही संकल्पना सविस्तर स्पष्ट करणे.

४. मराठी कथेतील माणदेशाच्या चित्रणाची पाहणी करणे.

५. मराठी कादंबरीतील माणदेशाच्या चित्रणाची पाहणी करणे.

६. मराठी कथात्मक साहित्यातील माणदेशाच्या चित्रणाचे मूल्यमापन करणे.

७. सदर चित्रणाच्या अभिव्यक्तीचे स्वरुप जाणून घेणे.

८. ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, द. ता. भोसले ह्या चार प्रमुख मराठी साहित्यिकांच्या कथात्मक साहित्यातील माणदेशाच्या चित्रणाचे वेगळेपण शोधणे.

## १.५. वापरलेल्या संशोधनपद्धती व स्वीकारलेले धोरण :

'मराठी कथात्मक साहित्यातील माणदेशाचे चित्रण' अभ्यासताना मी प्रामुख्याने क्षेत्रीय, ऐतिहासिक व समाजशास्त्रीय अशा तीन संशोधनपद्धतींचा अवलंब केलेला आहे. क्षेत्रीय संशोधनपद्धतीमुळे 'माणदेश' ही संकल्पना स्पष्ट करुन घेण्यास मदत झाली. ऐतिहासिक संशोधनपद्धतीमुळे माणदेशातील बदल व त्या बदलाचा मराठी कथात्मक साहित्यिकांनी घेतलेला शोध तपासण्यास मदत झाली. तसेच माणदेशातील एक ज्येष्ठ साहित्यिक द. ता. भोसले ह्यांची मुलाखत सदर संशोधनासाठी उपयोगी पडली. समाजशास्त्रीय संशोधनपद्धतीमुळे समाजजीवन व सांस्कृतिक पार्श्वभूमी ह्या विषयीचे कथात्मक साहित्यातील चित्रण तपासून पाहता आले.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कथात्मक साहित्यामधून माणदेशाचे चित्रण विपुल प्रमाणात आलेले आहे. त्यातील ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात व द. ता. भोसले ह्या मोजक्या व महत्त्वाच्या चार साहित्यिकांच्या कथात्मक साहित्यावर लक्ष केंद्रित करण्याचे धोरण स्वीकारले आहे. हे संशोधन आशयाच्या अंगाने केलेले आहे. हे करताना वरील साहित्यिकांव्यतिरिक्त अन्य साहित्यिकांचेही कथात्मक साहित्य त्यातील माणदेशाच्या चित्रणाच्या संदर्भात विचारात घेतले आहे. उपरोक्त चार साहित्यिकांचा अभ्यास करताना त्यांचा क्रम जन्मज्येष्ठता व लेखनज्येष्ठता ह्यांचा तारतम्याने विचार करुन ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात व द. ता. भोसले असा निश्चित केलेला आहे. दुसरे असे की, ग्रंथरुपाने प्रकाशित झालेल्या व माणदेशाचे चित्रण विपुलतेने तसेच विविधतेने करणारे मराठी कथात्मक साहित्य मी ह्या संशोधनात विचारात घेतलेले आहे. हे करीत असताना मी कोणत्याही प्रकारचे पूर्वग्रह, गैरसमज ह्यांना थारा न देता तटस्थ व चिकित्सक वृत्ती अवलंबलेली आहे.

## १.६. प्रबंधाची मांडणी :

ह्या प्रबंधात 'उपोद्घाता'चे पहिले प्रकरण व 'उपसंहारा'चे शेवटचे प्रकरण धरुन एकूण सात प्रकरणे आहेत. 'उपोद्घात' मध्ये मराठी कथात्मक साहित्यातील माणदेशाच्या चित्रणाचे संशोधन का व कसे केलेले आहे. ह्याविषयी थोडक्यात माहिती दिलेली आहे. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला प्रास्ताविक व शेवटी समारोप दिलेला आहे.

'ग्रामीण व प्रादेशिक कथात्मक साहित्य' ह्या दुसऱ्या प्रकरणात प्रास्ताविक, कथात्मक साहित्य म्हणजे काय, ग्रामीण साहित्याचे स्वरुप, प्रादेशिक साहित्याचे स्वरुप, ग्रामीण व प्रादेशिक साहित्यातील साम्यभेद, ग्रामीण व प्रादेशिक कथात्मक साहित्याची वाटचाल व समारोप अशा सात उपप्रकरणांचा समावेश आहे.

'माणदेश : सर्वांगीण परिचय' ह्या तिसऱ्या प्रकरणात प्रास्ताविक, 'माणदेश' ह्या संकल्पनेविषयी चर्चा, माणदेशाची भौगोलिक रचना, माणदेशाचा इतिहास, माणदेशाचे सामाजिक जीवन, माणदेशाची आर्थिक परिस्थिती, माणदेशाची धार्मिक व आध्यात्मिक स्थिती, माणदेशची भाषा व वाङ्मय, माणदेशाच्या चित्रणाची वैशिष्ट्ये व समारोप अशा दहा उपप्रकरणांचा समावेश आहे.

'मराठी कथेतील माणदेशाचे चित्रण' ह्या चौथ्या प्रकरणात प्रास्ताविक, मराठी कथेचे स्वरुप व वाटचाल, जन्मज्येष्ठतेनुसार ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, द. ता. भोसले व उत्तम बंडू तुपे ह्यांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण, अन्य कथाकारांच्या कथेतील माणदेशाचे चित्रण व समारोप अशा पाच उपप्रकरणांचा समावेश केलेला आहे. तसेच संशोधनविषयातील प्रत्येक साहित्यिकाचा अल्प परिचयही सुरुवातीला दिलेला आहे. शेवटी निष्कर्ष व निरीक्षणे नोंदवली आहेत.

'मराठी कादंबरीतील माणदेशाचे चित्रण' ह्या पाचव्या प्रकरणात प्रास्ताविक, मराठी कादंबरीची वाटचाल, मराठी ग्रामीण व प्रादेशिक कादंबरीची वाटचाल, नंतर जन्मज्येष्ठता व लेखनज्येष्ठता ह्यानुसार ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, द. ता. भोसले व उत्तम बंडू तुपे ह्यांच्या कादंबरीतील माणदेशाचे चित्रण, निष्कर्ष व निरीक्षणे, समारोप ह्या सहा उपप्रकरणांचा समावेश केलेला आहे.

'मराठी कथात्मक साहित्यातील माणदेशाच्या चित्रणाची अभिव्यक्ती' ह्या सहाव्या प्रकरणात प्रास्ताविक, मराठी कथेतील माणदेशाच्या चित्रणाची अभिव्यक्ती, मराठी कादंबरीतील माणदेशाच्या चित्रणाची अभिव्यक्ती, समारोप अशा चार उपप्रकरणांचा समावेश केलेला आहे.

प्रबंधातील ह्या सहा प्रकरणानंतर 'उपसंहार' हे सातवे व शेवटचे प्रकरण असून त्यामध्ये प्रास्ताविक, ग्रामीण व प्रादेशिक साहित्यातील भेद, 'माणदेश' ही संकल्पना, माणदेशी कथेतील वेगळेपण, माणदेशी कादंबरीतील वेगळेपण, माणदेशी चित्रणाचे

मूल्यमापन, माणदेशी चित्रणाच्या अभिव्यक्तीचा वेगळेपणा अशा सात मुद्द्यांच्या आधारे सूत्ररुपाने निष्कर्ष व निरीक्षणे मांडलेली आहेत.

'उपोद्घात' व 'उपसंहार' ही दोन प्रकरणे वगळता सर्व प्रकरणांच्या शेवटी 'संदर्भ व टीपा' ह्यांचा समावेश केलेला आहे.

प्रबंधाच्या शेवटी 'परिशिष्टे', 'संदर्भसूची', 'दर्शिका' असे तीन स्वतंत्र भाग समाविष्ट केलेले आहेत. पैकी परिशिष्टांमध्ये माणदेशाचे चित्रण करणाऱ्या कथा व कादंबऱ्या ह्यांची कालानुक्रमे सूची ; तसेच द. ता. भोसले ह्या माणदेशातील ज्येष्ठ साहित्यिकाचे मनोगत जाणून घेण्यासाठी घेतलेली मुलाखत ; तसेच 'माणदेश' ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी माणदेशाची व्याप्ती दाखविणारा नकाशा क्रमांक एक ; माणदेशातील गावे, शहरे, तालुके दर्शविणारा नकाशा क्रमांक दोन; सातारा, सांगली व सोलापूरमध्ये विभागलेला माणदेश नकाशा क्रमांक तीन; माणदेश : माणगंगा नदीचा जलप्रवाह दर्शविणारा नकाशा क्रमांक चार; नवीन माणदेशाचा नकाशा क्रमांक पाच हे सर्व परिशिष्टांमध्ये समाविष्ट केलेले आहे. तसेच 'संदर्भसूची' मध्ये साधनसूची व साहाय्यक सूची अशा दोन सूचींचा समावेश आहे. पैकी 'साधनसूंची' मध्ये माणदेशाचे चित्रण करणाऱ्या कथा व कादंबऱ्या ह्यांची कालानुक्रमे सूची अंतर्भूत आहे; तर 'साहाय्यक सूची' मध्ये सदर संशोधनासाठी साहाय्यक ठरलेले ग्रंथ, मान्यताप्राप्त एम्.फिल्. प्रबंधिका, मान्यताप्राप्त पीएच्.डी. प्रबंध व नियतकालिके ह्यांची कालानुक्रमे सूची अंतर्भूत आहे.

'दर्शिके' मध्ये व्यक्तिसूची, ग्रंथसूची / नियतकालिकसूची व विषयसूची ह्यांचा समावेश केलेला आहे.

## १.७. समारोप :

'मराठी कथात्मक साहित्यातील माणदेशाचे चित्रण' ह्या संशोधन विषयातून 'माणदेश' ही संकल्पना स्पष्ट करुन मराठी कथांमधून व मराठी कादंबरीमधून माणदेशाचे चित्रण कोणत्या पद्धतीने झालेले आहे, ह्याचा सविस्तर अभ्यास करणार आहे. त्यातून माणदेशाचे वेगळेपण कोणते, माणदेशी चित्रणाच्या अभिव्यक्तीचे स्वरुप कसे आहे, या सर्व संशोधनातून हाती निष्कर्ष व निरीक्षणे शेवटी मी नोंदवणार आहे.

---- ❖ ❖ ❖ ----